म. ग्रं. सं. ठाण
विषय काव्य
सं. नं. ५६८
१९२४

...थमालेचें पुष्प सहावें

# सतीचा शाप

काव्य ५६८

REFBK-0002566
REFBK-0002566

नाथ निफाडकर

महाराष्ट्र ग्रंथमाला–पुष्प सहावें

# सतीचा शाप

The spirit in whose honour shrines are weak.
Chand, the bard.

लेखक,

नाथ निफाडकर

प्रस्तावनालेखक

शंकर केशव कानेटकर बी. ए.

मराठी ग्रंथ सं...
नं. ३. ८०८
मराठी ग्रंथ संग्रहालय
२५६६
REFBK-0002566
REFBK-0002566

१९२४

आवृत्ति १ ] धुळें. [ किंमत चार आणे

गाची सुसंगत जुळणी करून, कवीला ती आपल्या भावनेच्या भाषेंत-वठवावयाची असते; कविदृष्टीला दिसणारीं ऐतिहासिक मनोमय चित्रें रसानुकूलतेनें शब्दमय करायचीं असतात; वाचकांना घटकाभर त्या काळांत नेऊन, त्यांच्यापुढें पूर्वजांचें तेज मूर्तिमंत स्वरूपांत उभें करायचें असतें; आणि क्षणभर त्यांच्या कल्पनेस त्यांतच रंगवून सोडून, त्यांच्या मृत भावनेस जिवंत करायचें असतें. हें आत्मप्रत्ययाचें म्हणजे स्वतांची स्वतांस ओळख पटविण्याचें काम, ऐतिहासिक कविता करिते. रा.निफाडकरांनीं हेंच काम स्वयंस्फूर्तीनें स्वीकारून हातावेगळें केलें आहे.

रूपसुंदरीसारख्या शुद्धशील कुमारीला करणानें आपल्या अनावर पापी इच्छेनें भ्रष्ट केल्यामुळें, तिच्या चुलतीनें सती जातांना तळमळून त्याला शाप दिला; तो शाप, त्याला, त्याची राणी कमला व मुलगी देवल यांस कसा भोंवला; व त्याची सत्यप्रचीति म्हणून, या दोघींवर शेवटीं शीलभ्रष्ट होण्याचा प्रसंग मुसलमानी सत्तेपुढें कसा आला, याचेंच शब्दचित्र या काव्यांत रा. निफाडकरांनीं रेखाटलें आहे. मूळचें कथानक सुंदर व ओजस्वी असून कविकल्पनेसही त्यांत पुष्कळ अवसर आहे. कथानकाचा धागा व त्यांतील चढउतार कळण्यास सोपे जावेत व कलेच्या दृष्टीनें ही, काव्यास उठाव मिळावा, म्हणून, कथानकाची मांडणी करतांना, त्यांत ' आदि ', ' मध्य ', व ' अंत ' अशा तीन टप्प्याची योजना करण्यांत आली आहे. माझ्या मतें ही योजना अत्यंत समर्पक व सहजसुंदर आहे. त्याचप्रमाणें पुढील कथानकाची लांबण कंटाळवाणी होऊं नये म्हणून, रूपसुंदरीचें उपाख्यान, आरंभीं अगदीं थोडक्यांत आटोपतें घेतलें आहे; पूर्वसंदर्भ कळण्यास तें जरी थोडें अपुरें वाटतें, तथापि प्रमाणबद्धतेच्या दृष्टीनें व प्रस्तुत खंडकाव्याचा समावेश लक्षांत घेतां, असें करणें युक्तच होतें. प्रथमदर्शनीं या काव्यांत पात्रांची खिचडी झाल्यासारखी वाटते; प्रदीर्घ काव्यांत पात्रांच्या महत्वाच्या व जरुरीच्या मानानेंच त्यांच्या स्वभावपरिपोषास अवसर द्यायचा असतो;

नाहींतर काव्य आटपशीर करतांना, पात्रांची अनेकता काव्यास क्लिष्टता आणते. पण रा. निफाडकर यांनीं, या सर्व गोष्टींची जाणीव ठेवूनच काव्य शक्य तेवढें सुश्लिष्ट व सुस्पष्ट करण्याचा, शेवटपर्यंत, प्रयत्न केला आहे. गज्जलराजा अमीर खुश्रू या फारशी कवीनें खिजरखान व देवल यांच्या शृंगाराचें मात्र वर्णन केलें आहे. तसल्या रसवर्णनांत मराठी कवि या नात्यानें आपण हार जाणार नाहीं, असें कवीनी ह्मटलें आहे. जोपर्यंत तशीं समान विषयांचीं वर्णनें डोळ्यांपुढें नाहींत, तोंपर्यंत मराठी शाहीरांची फारशी कवींशीं तुलना करतां येणार नाहीं. पण देवलदेवीवर एवढें काव्य गुर्जरभाषेंत देखील नाहीं. पापी पिता व शीलभ्रष्ट माता यांच्या पोटीं जन्मास येणारी कन्या निसर्गाच्या नियमाप्रमाणें, व एका सतीचा शाप ह्मणून, शीलभ्रष्ट निघावी, हें जितकें साहजिक, तितकेंच करुणाजनक आहे; आणि इथें कवींनीं इतिहास व कल्पकता यांची उत्तम सांगड घातली आहे. पण 'या काव्यांतील धीरोदात्त नायक व नायिका कोण', या प्रश्नांस शेवटपर्यंत उत्तर देतां येत नाहीं. कारण भ्रष्टशील खिझरखान पापी, व शंकरदेव काव्यांत बेपत्ता, म्हणून, कुणी नायक नाहीं; तर रूपसुंदरी उपाख्यानांतील ह्मणून, अणि कमलाराणी व देवलदेवी प्रसंगविशेषींच काव्यांत डोकावणाऱ्या, म्हणून, नायिकाही नाहीं. माझ्या मतें, या काव्यांत, ही एक मोठी उणीव आहे. पण ऐतिहासिक काव्यांत कवीला बसणारीं बंधनें लक्षांत घेतां, याबद्दल कवीच्या लेखणीस दोषी धरतां येत नाहीं.

या काव्यांतील दुसरा विशेष ह्मणजे यांतील निर्यमक कविता हा होय. दोन ओळींच्या मात्रावृत्तांत व विशेषतः धावत्या खंडकाव्यांत निर्यमक वृत्ताची ही योजना अभिनव आहे; पण श्रेयस्कर कितपत होईल, हा प्रश्न कालान्तरानें सुटणारा आहे. निर्यमक कवितेचा वाद आतां जुना झाला असून, गणवृत्तात्मक निर्यमक कविता परिचयामुळें जनतेच्या पचनीं पडूं लागली आहे. परंतु काव्यवाङ्मयांतील प्रस्तुतचा काळ प्रयोगावस्थेचा असल्यामुळें या उश्नाचें उत्तर देण्यास भविष्य कालच सर्वस्वी समर्थ आहे; आज सहानुभूती मात्र हवी आहे. एवढें खरें कीं, वृत्तीची भरदार, चप्खल रचना व शद्बांचें नादमाधुर्य हे दोन गुण पूर्णत्वानें असल्याखेरीज, नुसतें निर्यमकतेच्याच बाबतींत केलेलें इंग्रजीचें

अनुकरण कितपत यशस्वी ठरेल, ही शंका आहे. निर्यमक कवितेंत प्रत्येक ओळीच्या अंतर्रचनेची व अंत्याक्षराची योजना फार समर्पक असावयास पाहिजे; नाहींतर कचित् स्थळीं आलेले 'आंखोमे' 'गहिन्या' 'सतिच्या त्या' असले अंत्य शब्द काव्यांत कर्णकटुताच उत्पन्न करितात.

मधून मधून निरनिराळीं वृत्तें योजण्यांत रसिकाभिरुचीस थोडा थारेपालट झाल्यासारखा वाटतो; वृत्ताची सफाई आणखी कसून केली असती तर काव्यास अधिक सुंदरपणा आला असता. रा. निफाडकर यांची भाषा तडफदार, प्रसंगानुकूल व अस्खलित आहे. आत्मविकत्थनामुळें ती कचित् स्थळीं उत्तान वाटते; पण तें शाहिरी थाटाचें लक्षण आहे. काव्याच्या ' मध्यां 'तील देवलचें भाषण व मराठे वीरांचा रणशृंगार हीं प्रकरणें सावेश उतरलीं आहेत.

" धुंदी चढली, छाती फुगली वीरांची पानें
समराचा मद चढला, चढल्या भिवया नेत्रांच्या
प्रत्यंचाचे टणत्कार ही गडगडले समरीं
केदारेश्वर रुद्र भयानक संगरींच भरला "

या ओळींतील वीरश्रीचें वर्णन स्फूर्तिप्रद आहे. त्याचप्रमाणें 'अन्तां'-तील देवलनें कमलाराणीस दिलेलें उत्तरही बाणदारपणाचें व मननीय आहे. नाहक छळाच्या पापाचें प्रायश्चित्त—

" यवनें नेलें गुर्जरभूपा खोलच नरकांत "

या ओळींत पूर्ण प्रतिबिंबित झाल्यानें, ' सतीचा शाप 'संपूर्ण फलद्रूप झाला आहे.

रा. निफाडकर हे शाहिरी बाण्याचे कवि आहेत. गुर्जर देशाच्या इतिहासांतील चित्राप्रमाणेंच, महाराष्ट्राच्या इतिहासांतील उज्वल चित्रें ते आपल्या सरस लेखणींतून निर्माण करून, जनतेपुढें उभी करतील, तर आपल्या काव्यसुधेनें, आजल्या मेलेल्या समाजास, उद्यांकरितां जिवंत केल्याचें श्रेय त्यांना खास मिळेल. उदयोन्मुख जनतेनें आपल्या शाहीराकडून अशी अपेक्षा केल्यास त्यांत कांहींच अनुचित नाहीं, असें वाटतें.

पुणें
ता. २७ ऑगस्ट २४, } **शंकर केशव कानेटकर**

२५६६

## आभारप्रदर्शन

श्रीकृष्ण-परमात्म्याच्या कृपेनें महाराष्ट्रग्रंथमालेचें हें सहावें पुष्प आज रसिकांना देण्याचा सुयोग आला आहे. एका महिन्यापूर्वी सौ. उमाबाई सहस्त्रबुद्धे यांचें ' स्त्रीगीतलहरी ' हें आठवें पुष्प वाचकांना अर्पण करण्यांत आलें होतें, व आणखी महिन्यापंधरा दिवसांतच प्रसिद्ध ' काव्यकौमुदी' नामक ग्रंथ, सातवें पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येईल, चवथ्या पुष्पापासूनचीं सगळींच पुष्पें काव्याचीं झालीं हा ईश्वरी योगायोग; दुसरें काय ? नववें व दहावें हीं पुष्पें गद्याचीं होतील एवढें मात्र आज सांगतां येईल,

आमच्या महाराष्ट्रग्रंथ मालेवर महाराष्ट्रीयांची पूर्ण कृपा दृष्टि आहे; आमचें एकहि पुष्प त्यांनीं खालीं पडूं दिलें नाहीं; या उत्तेजनाची जाणीवच आमच्याकरवीं कार्य करवून घेत आहे. परंतु रसिक वाचकांबरोबर सहृदय लेखक, मार्मिक प्रस्तावनाकार व झोंकदार आणि खोंचदार टीकाकारहि मालेस लाभतात हेंहि उत्तेजन कांहीं लहानसान नाहीं. श्री. न. चिं. केळकर. श्री. के. ल. ओगले, श्री. मा. श्री. अणे, श्री. सोनाळकर, श्री. अनंततनय व आतां श्री. शंकर केशव कानेटकर ऊर्फ गिरीश अशासारखे प्रख्यात प्रस्तावनाकार जिला लाभले व लाभणार आहेत अशी ही महाराष्ट्रग्रंथमाला लोकादरास पात्र झाली नाहीं तरच नवल. आजच्या प्रसंगापुरतेंच बोलावयाचें म्हणजे कविमित्र श्री. गिरीश यांनीं आपला काव्यव्यासंगांतील बहुमोलाचा वेळ खर्चून जी प्रेमळ पण मार्मिक, लघुस्थली पण दीर्घचिंतनी, अशी प्रस्तवना लिहून दिली आहे तिचे अखिल महाराष्ट्रकाव्यमंदिरांत विशेष चांगले परिणाम होणार आहेत. हा सुमंगल प्रसंग घडवून आणल्याबद्दल आमचे कविमित्र श्री. गोपाळराव अधिकारी व ज्येष्ठ कविमित्र श्री.

अनंततनय यांशींहि आम्ही कृतज्ञ असलें पाहिजे. श्री. अनंततनयांचा अभिप्राय या पुस्तकांत दिलाच आहे; व तो अभिप्राय प्रसिद्ध करण्याची परवानगी दिल्याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

इतरांबरोबर श्री. गोपाळ गंगाधर पोतदार ऊर्फ मनोहर कवि, यांचेहि आम्ही आभार मानले पाहिजेत. कारण त्यांनीं काव्य ऐकल्यानंतर, देवल म्हणजे स्कॉटची Amy Robsart ( Kenilworth ) च होय असे आपलें प्रांजल मत दिलें. या खडखडित अभिप्रायाचें मनःपूर्वक कौतुक करून आम्ही रा. पोतदारांस इतकेंच उत्तर देतों कीं देवल व ॲमी या दोघी कोंवळ्या कौमार्याच्या सरत्या देहलीवरच्या होत्या यापलीकडे दोघींत कोठेंहि सारखेपणा नाहीं. एखादी सुंदर पोर पाहिल्यावर ही तींच बरें कां असा आलाप कामुक प्रेमाचा अतएव असत्य असतो. तथापि ॲमीच्या नांवामागें प्रस्तुत लेखकाला मनोहरांनीं स्कॉट्च्या नांवाशीं उभें केलें ही कल्पना त्यांना नाहीं तरीं या लेखकाला मनोहर वाटतें, व म्हणूनच हा त्यांचेहि आभार मानतों.

या ग्रंथाला उजेड दाखविण्याचें सर्व श्रेय कविमित्र रा. अधिकारी यांचेंच आहे; व त्याला आभारांची किंमत फारच कमी पडेल.

नाथ निफाडकर

—

७१०५ नं. ५५८

## कथानक

प्रस्तुतच्या काव्याचीं आदि, मध्य व अंत अशीं तीन खंडें केलेलीं आहेत.

अल्लाउद्दीन खिलजीनें गुर्जर देशावर स्वारी केल्याचें प्रसिद्धच आहे. परंतु त्याला तेथें विजय मिळण्याचें खरें कारण इतकें प्रसिद्ध नाहीं. तें असें कीं गुर्जर भूपति जो करण त्यानें आपला अमात्य जो माधव त्याच्या रूपसुंदरी नामक कुमारिकेचा अभिलाष धरिला होता. यालाही एक कारण होतें. त्याची राणी कमलादेवी इचें उदेपूरच्यां भीमसिंगावर प्रेम होतें. त्यामुळें खऱ्या प्रेमाचा भुकेला होऊन करणानें रूपसुंदरीवर, अमात्यास परप्रान्तीं पाठवून अत्याचार केला ! त्याप्रसंगीं माधवाच्या धाकटया भावाचा खून होऊन त्याच्या साध्वी स्त्रीनें करणास शाप दिला कीं, " तुझें राज्य यवन घेतील, तुझ्या बायकोवर व मुलीवर यवन अत्याचार करतील, एवढेंच नव्हें, तर देवलदेवीला तर अस्पृश्यदेखील बाटवील ! " तिकडे माधवांस ही बातमी कळतांच तो दिल्लीस जाऊन शत्रूस फितूर झाला. अल्लाउद्दीनानें अलफखानास करणावर पाठविलें. अलफानें अनहिलवाडा काबिज करून गुर्जरहि हस्तगत केला व कमलादेवीस पकडून दिल्लीस पाठविलें. ती बादशहाची बेगम झाली. इकडे करण राजानें आपल्या चार वर्षांच्या देवलदेवीला घेऊन देवगिरीच्या रामदेवरावाचा आश्रय घेतला. तत्पूर्वी अल्लाउद्दीनानें जातीनिशीं रामदेवरावाच्या गळ्यांत मांडलिकत्व मारलेले असल्यामुळें रामदेवरावानें करणास बागलाण किल्ला आश्रयास दिला, आज तो किल्ला नाशिक जिल्ह्यांत मोडतो; असो. या गोष्टीस दहा वर्षें झालीं. दरम्यान कमलाराणीनें देवलदेवीला आणविण्याचा तगादा लाविल्यामुळें, व रामदेवरावाची, करणाच्या मुलीशीं शंकरदेवाचा विवाह लावून स्वतंत्र होण्याची खटपट चालल्या-

मुळें, खिलजीनें अलफखानास बागणावर व मलिक काफ़ूर यांस देव-गिरीवर पाठविलें. व ( आदि ) अलफखानानें करणास देवल पाठ-वून देण्याचा खलिता पाठविला. देवलनें, चौदा वर्षांचें कोंवळें वय असूनहि, त्या खलित्याचा धिक्कार केला व रजपूत व मराठे यांना किल्ला लढविण्याचें प्रोत्साहन देणारे भाषण केलें. एक घन-घोर संग्राम झाला. त्यांत मराठयांनीं अलौकिक शौर्य दाखविलें. परंतु मुसलमान संख्येनें जास्त असल्यामुळें करणाला देवल-देवीस जोहार करण्याचा उपदेश करावा लागला. देवलचें शंकरदेवा-वर प्रेम असल्यामुळें तिनें रात्रीं गुप्तपणें देवगिरीला जाण्याची पित्या-ची आज्ञा घेतली; व दोनतीनशें शूर रजपूत घेऊन ती देवगिरीकडे निघाली. ती वेरूळपर्यंत सुखरूपपणें पोंचली व तिला देवगिरीचे दिवे दिसू लागले. इतक्यांत वेरूळच्या खेडयांत रात्रीची जल्लोष करण्यास गेलेल्या एका मुसलमानी पथकानें त्यांच्यावर हल्ला केला. सर्व रजपूत सर झाले. दासींनीं जोहार केला. पण देवल कैलासांत लपली. परंतु एका दुष्ट मुसलमानाच्या दृष्टीस ती अखेर पडलीच. तिची लवकरच दिल्लीस रवानगी झाली. ( मध्य ) दिल्लीस कमलाराणीनें तिला अल्लाउद्दीनाचा मुलगा जो खिझरखान त्याची बेगम होण्याचा उप-देश केला. देवलनें मातेचा धिक्कार केला. त्यामुळें पूर्वस्मृति होऊन कमलेनें तिला दाक्षिणेंत पाठवून देण्याचें ठरविलें. तो बेत खिझरखानानें अडून ऐकिला. त्यानें कमला राणीस कैद केलें, व आपल्या मोहक वाणीनें देवलदेवीस भुलविलें. देवल वश झाली. पुढें अल्लाउद्दीन मेला; व खिझर देवलशीं लंपट झाल्यामुळें एका सरदारानें त्याचें डोळे काढिले, व देवलशीं निका ला विला. नंतर त्या सरदारालाहि एका भंग्यानें पदच्युत केलें व त्यानेंहि देवलची अब्रु घेतली ! अशा रीतीनें सतीचा शाप फलद्रुद झाला ! ! ( अंत )

———

ठी ग्रंथ संग्रहा…
ठाणे.

# सतीचा शाप

## आदि

देवलदेवी, अभागिनी ये, या माझ्या कवनीं;
थाप डफावर बसली, चढली तार तुणतुण्याची !
जोहाराचा भाट न करितो थाट तुझ्या नांवें
म्हणुनी रुसुनी बसूं नको गे काळाच्या मागें.
दिक्कालाचा जाडा पडदा फाडुनि टाकील—
नाथ मराठी डफावरी तुज खूप रंगवील.
अम्ही मराठे बहू दांडगे, रांगडीच भाषा—
अमुची, देवी, नको म्हणूनी फिरवूं गे माथा.
फिरवूं आम्ही भाषा अमुची, जशी भिंगरी गे,
रस करुणेचा वीर रसासम अम्हांसही ठावे.

तुला, तुझ्या त्या पित्यांस, दिधला आश्रय आम्हीच,
तुझ्याच नांवें अखेर मेला शंकर समरांत !
रजपूतांचा पूत मराठा, हा ठरला न्याय;
रक्तासाठीं रक्त जिवास्तव जीव मरुनि जाय !
दिल्लीपतीनें तोडावा तो चितोडचा किल्ला,
इकडे याव्या विनायकाच्या डफावरी थापा !
उदेपूराच्या करुणमूर्तिनें प्यावें तें वीष,
विनायकानें छेडावी मग तुणतुण्याचि तार !
विनायका ! रे कलिजा माझ्या ! दे आशीर्वाद !
पराक्रमाचा तुझाच घेतों डफ हा शाहीर.

तुझ्या डफावर जोहाराचा रंग भडक लाल;
भडके माझें रक्त म्हणोनी तो मजसी प्यार !
माझी देवी देवलदेवी भ्रष्ट जरी झाली,
नच एकाची परी तिघांची बेगमता त्याली,
सौभाग्याच्या दिनींच झालें स्वच्छ तिचें भाल,
जरी पांढऱ्या पांयाची ती जन्मापासूनी,
जरी उभा हा देश आजही तिच्याच रूपानें,
वर्णायातें जरी मसी ते अपजय सारेच,
तरी गुरो, ती माझ्या कवनीं फोडीलच टाहो;
किंकाळी ती मारिल कीं जी हृदयें फाडील !
असातिल माझे भाई सारे मेलेलीं प्रेतें,
तरी उठोनी बसातिल आतां माझ्या या कवनें !
मात्र तुझा तो हात असों दे या माझ्या शीर्षीं;
चढली त्याशी तार पहा ही, डफ नाचूं आला.

२

रूपसुंदरी ! कशास झालें सुंदर रूप तुझें ?
सौंदर्याच्या पायीं अपुलें वैभव तें गेलें !
अथवा करणा सौंदर्यातें कां भुलला तूंच ?
सुंदरतेची चूक ठरावी ना तव राज्यांत ?
सुंदरतेची भूक मरावी ज्या रे, काजांत,
सुंदरतेची यावी सूजच त्या कृमि राज्यांत
माधवराया असती नुसती रति तव दर्शविली,
असती त्यानें तुला अर्पिली कन्या रे अपुली.
सचीव म्हणुनी पाठवुनी त्या दूर परप्रान्तीं
तत्कन्येच्या कौमार्यावर घातलास घाला !

कौमार्याची गांठ तुटावी अपुल्या मार्गेच—
नीच पाशवी पशो, वृत्ति ही नच रजपूतांची !
सुख क्षणाचें घ्याया दिधला बाळि माधव बंधू;
सुख क्षणाचें, शाप सतीचा कायमचा शीर्षी !
" नीचा ! करणा ! यवनाहस्तीं होइल तव नाश !
अस्पृश्यांचा तुझ्या स्त्रियांच्या अंगीं बाहुपाश !!"
सहा शतें जाहलीं तुझ्या त्या पापाला आज;
राहियलें नच, पालटलें तें जग सारें आतां.
शापायातें शक्ति न कोणा नच श्रद्धा शापीं;
सतीमहात्म्या दिधली सीमा मूर्खपणाची ती.
तरी नरा, जी करी न प्रेमा अपणावरि नारी,
तिचा धरावा लोभ असें हें पापच रे आज !
पापा पाठीं सापाचा रे, दंश ठेवियेला;
माधव गेला परभारें तो शत्रुसहाय्याला.
उजवा डोळा तुझ्यावरोनी फिरवोनी खिलजी
गेला होता देवगिरीतें हें तुजसी ठावे.
रक्त तुझें तें रजपूताचें घेउनि ध्यानांत
स्वस्थच होता बादशहा तो शोधित रे पेच.
तकदीराचा मोठा खिलजी, खोटा तूं करणा;
माधवरूपें दिधलें त्याच्या हातीं रे कर्णा !

३

आला ! आला ! लोंढा आला लांडयांचा त्वेषें !
गुर्जरवैभव अनहिल गेलें अनलाच्या तोंडीं.
अलफखान तो अनल तयासी माधव तो अनिल;
अनलानिल ठेवितील कैसें अनहीला स्थानीं ?
करणें दिधली टांच आपुल्या नीलकंठ अश्वा;

तोंच उदेली प्रीति आपुल्या पत्नीदुहितांची
मध्यरात्र होउनी प्रहर दो त्यावरती झाले;
आगेचे परि डोंब तसेच्या तसेच राहियले.
तरी पित्याचें पतिचेंही तें हृदय द्रवलेलें,
फिरलें वाडयाकडे अब्रुतें न्यायाते तिथुनी.
पुरें न ठावें जिला बोलणें अजुनी ती बाला
चारच वर्षांची, ती होती झोपडींत एका.
अन्नाला जागला असा तो वृद्ध तिच्याजवळीं
होता बसला हात लावुनी तिच्या कपाळाला !
निळकंठाची टाप तयाच्या कर्णावरि पडतां
करणा धरिलें थोपवुनी त्या वृद्धें तेथेंच,

" स्वामी, घ्यावी बाला अपुली, जावें येथोनी;
कमलादेवी अलफें नेली अपुल्या डेऱ्यांत.
दहावीस ना एकही न हो, अपुला स्नेहि इथें;
अनहिल गेला खाक जळोनी, राख तिथें पडली.
देवगिरीतें जावें आतां घेउनि कन्येतें;
फिरतां तकदिर उद्यां उभारा अनहिल पूर्वीचा.
जा स्वामी जा क्षणांत एका पळुनी रानांत;
वेशीदरवाज्यांत झुंजतों मी तोंपर्यंत. "
' हाय ! हाय ! ' या शब्दें घोडा फिरवीला करणें !
वृद्धें दिधला प्राण लढोनी स्वामीच्या कार्यीं !

देवगिरीच्या भूपानेंही बागलाण किल्ला.
करणा दिधला, देवलदेवी तिथेंच वाढविली.
म्हणती कोणी कमलादेवी पट्टराणि झाली—
बादशहाची, छे ती झाली रखेल आवडती !

४

“ खुदावंत ! मेहेरबान ! करावी मेहेर नजर इजसी ! ”
कमलाबीबी ! हात जोडुनी वदली खिलजीसी;
“ अजब अशा या ऐनेमहालीं सुख सारें मजसी;
काय कमी साम्राज्ञीहूनी आवडत्या इजसी ?
हत्ती डुलती फत्तेबुरुजासमोर माझ्या या;
पद्मिनीहि त्या उदेपुराची काय करिल मौजा ?
कारंजाचे तुषार उडती गुलाबपाण्याचे;
गुलाबपंक्ती घेउनि त्यांतें हसती आनंदें !
मोर पिसारे पसरुनि अपुले नाचति डौलानें;
सायंकाळीं आम्रांवरती पिक गाती मोदें.
रंगमहालीं शेजेवरती फुलती जाइजुई;
चिराक जळती देति सुगंधा केतकिच्या तैलें;
या अफगाणी दासी देती पेले मदिरेचे;
विंझणवारा घालघालुनी संतोषवि बहुची !
मलिक् काफुरें पुन्हां आणिली पोर पैठणाची
रडते दडते अखेर घेते तान भैरवीची !

५

“ खुदावंत ! खाविंद असें हें वैभव दासीचें—
देवलदेवीविना भासतें उदास जन्माचें !
असेल झाली देवल माझी चौदा वर्षांची. ”
नयनीं आलीं तिच्या आंसवें कन्येच्या स्मृतिनें !
“ काय तिच्या त्या टपोर काळ्या विशाल आखोंमे
असेल पाणी आज चकाकत रत्नासम गहिऱ्या !
काळा काळा असेल रुळला पाठीवर नाग,
टांचा असतिल देत तयातें सारा आधार.

तप्त सुवर्णासम कांतीनें असेल ती खुलुनी;
असेल झाली बागलाणची देवल वनदेवी.
देवलदेवीविना वल्लभा, लाभ न मज जगुनी;
आणा तिजसी सांगसांगुनी गेलें मी दमुनी ! "

६

" कटकबंद गड बागलाणचा कोटें वेढियला;
तरि राजेंद्रा देवल द्यावी शंकरदेवाला.
देवगिरीच्या राजानें हा निरोप पाठविला;
" सोयरीक ही करील अपुली प्रेमाची वृद्धी.
खिलजी खिजरा, खिझरासाठीं देवल नेईल.
बहिरिससाणा चिमणीसाठीं झांपच घालील !
कमलाराणी झुरते ध्याया दर्शन कन्येचें;
येती आज्ञा दिल्लीपतीच्या ' पाठिव देवीसी ! '
तुजसाठीं म्यां राजेंद्रा रे, झुरलों भीतीनें;
वृद्धा आतां देवें न्यावें स्वर्गी गरदीनें !
दैवाचा मी बहू लाडका होतों तरुणपणीं;
तारुण्याच्या सवेंच नेलें म्लेच्छें दैवातें !
शंकरदेवा देवलदेवी देतां देवगिरि--
दैवाचा गिरि झरझर जाइल खचितच हो चढुनी.
गुर्जरही जाईल सुखाच्या शिखरीं स्वातंत्र्यें;
सती नर्मदा परकी होइल मग त्या म्लेंच्छांतें ! "

७

वृद्धाचा नच रुचला सल्ला गुर्जर भूपतिसी;
परावलंबी पर रक्ताची गुरमी ना जिरली !
' क्षत्रियवंशोत्पन्न कुठें मी ? कुठें रामदेव ?
जाधव कोठें क्षत्रिय कोठें ? भू कोठें स्वर्ग ? '

ऐशा मानापायीं घडते कुठें सोयरीक ?
खिलजी रुचला मात्र मराठा परकासा झाला!
अथवा व्हावा दिव्य सतीचा शाप फलद्रूप
म्हणुनी बुद्धी राजेंद्राची नसेल ना फिरली ?
' यवनें यौवन दारा देशहि न्यावें तव लुटुनीं; '
शापार्धानें रूप घेतलें मूर्त, सतीच्या त्या,
ना धन दारा नच राज्यहि तें हातिं एकराचें;
होतें त्याच्या मात्र नशीबीं प्रेम लेकराचें ! १५०
बहारलेला बगिचा गिळिला परकीं टोळांनीं;
मात्र कोकिळा एक राखिली त्याच्या नशिबानें.
सुवर्णभूमी गुर्जरशेती परक्यांची झाली;
मात्र मनाच्या आनंदाची देवल राहियेली.
कमलाराणी हरिणीला तो धीवर आवडला;
परि गोंडस तें कोमल पाडस पित्यास दे धीर !
विधे ! असो दे रत्न तरी तें त्या कमनशिब्यासी !
सती ! करी त्या क्षमा ! देइ गे उःशापा आतां ।
झाली शिक्षा तयास पापाहुनी फार थोर !
क्षमा करी वीरास ! आवरी आपुला शापार्ध !
तारहि झाली सैन पहा या तारिणिची आतां;
डफ देई ना नाद अम्हांतें ते करुणेचे गे ! १६२

———

## मध्य

" डफ देई ना नाद ! कशाला शाहिर झालासी ? "
गुरु बोले, " दे डफा प्यावया तें ताजें रक्त "

---

१ एकातरी.

" चल, डफा, करी आ ! देतों तुजसी अशुद्ध गनिमाचें,
रजपूतांच्या करणाच्या त्या समशेरींवरचें !
काफुर भारी काफर; गेला देवगडावरती,
उजव्या बगलीं बागलाण तो दिधला अलफासी.
अलफें खलिता दूताकरवीं करणा पाठविला,
" द्यावी देवल, देऊं खिझ्‌रा, करूं राणी तिजला.
मुडद्यांची वा तुमच्या साऱ्या करुनी पायघडी,
देवल जाइल रंगमहाली खिझ्‌राच्या, बटकी !
बादशहांची शेज वरावी रजपूतस्त्रीनें;
सूर्यावरची[1] शरवृष्टि नच राखिल अब्रूतें !"

२

देवल होती तिथेंच जैसें फळ झाडावरती,
अंगारच तो तिला वाटला खलिता झाडासी !
रक्त तिचें तें रजपूताचें कढकढलें भारी !
सळसळलेंही आलें सारें मग नेत्रांमाजी !
क्षणांत एका क्षत्रियकन्या उभी राहियेली,
जणों डसाया पूर्ण राहिली उभी नागिणी ती !
" करण पिताजी ! वीरांनो ! या क्षत्रिय कन्येची—
राखा लज्जा, अब्रू साऱ्या हिंदकन्यकांची !
कौमार्याला अमुच्या भिडतां गनिमाचा हात,
जाणा गेली कायमची हो, हिंदूची जात !
दिल्लीची मी दिल्ली व्हावें कां शृंगाराची ?
किंवा व्हावें सती पार्वती शंकरदेवाची ?
पडतिल मुडदे सडतिळ नरडीं क्षत्रियवीरांचीं

1 आपल्या आज्ञेशिवाय जाहत प्रखर झाल्याबद्दल सूर्यावर करणानें एकदां शरवृष्टि केली होती.

माझ्यासाठीं—नव्हे, आमुच्या मातृभूमिसाठीं !
हाणा मारा तोडा झोडा फोडा गनिमांतें
जाळा पोळा; करा सोहळा माझ्या लग्नाचा !
रक्ताच्या चिरकांडया—उत्सव गुलाबपाण्याचा !
मुंड मुंडकीं दहा हजारों—ओटि नारळांची !
मांसखंड चिखलास तुडोनी जाइन मी गिरिसी
शंकरदेवा अर्पिन माळा म्लेंच्छ मुंडक्यांची !
जा सांगा जा अलफा, वाहिन तुझें गोल डोकें
शंकरपायीं, नंतर येइन खिलजी माराया !
उठा करा जयघोष पुरातन एकलिंगजीचा !
तुम्ही मराठे बोला हरहर महादेव वाचा !! "

३

रणशेजेचा शृंगाराचा केशरि पोषाख
करुनि निघाला एकजात मग क्षत्रिय भाला तो !
ऐटदार पिळदार गुलाली डोईसी पगडी
घट्ट बांधुनी धीट मराठा घे समशेरीसी !
कुणी गोल कुणि अणकूचीची विशाल घे ढाल;
सर्वांचे परि फुरफुरले ते फुगलेले गाल !
लाल लाल जणुं जीत निखारे त्यांच्या नेत्रांत;
काळ काळ ते चीत कराया म्लेंच्छांसीं उठले !
' यशवंत ' ध्वजहस्ती समरामाजि ठाकला तो;
करणें आज्ञापिलें अफूचें पान तयाप्रती !
आल्या दासी दिले तयांनीं सरदारां पेले;
धुंदी चढली छाती फुगली वीरांची पानें !
समराचा मद चढला, चढल्या भिंवया नेत्रांच्या;
प्रत्यंचांचे टणत्कारही गडगडले समरीं !

केदारेश्वर रुद्र भयानक संगरींच भरला;
कैलासाचा भीषण डमरू ऊर फोडु लागला !
शंखाचेही निनाद गेले लांडयांच्या कानीं;
कानठळी जों बसली, पडलीं शिरकमळें तोंच !
वेताळांना ताळ न उरला; भूतें ओरडलीं;
पलंकशांनीं रक्ताचे ते प्राशियले हौद !
पडसे हिंदु अप्सरसांनीं त्यांसीं आलिंगिलें,
पडले लांडे; लवंड यांनीं त्यांसीं लाथडिलें !
शिरस्त्राण पोलादी फुटुनी जे धरणीं पडले,
त्या हिंदूसीं सुशोभवीलें पुष्पें अप्परसें !
ज्याच्या नेत्रामधून गेला बाण शिरामाजीं,
त्या हिंदूला सहस्र नयनें दिधलीं रंभेनें,
ज्या हिंदूचे हात माखले यवनांच्या रक्तें,
त्यासी नेलें मलयावरतीं भोगाया रतिनें !
दीन ! दीन ! दिन ! दीन !—करोनि एकच रणगजर !
हरहर हरहर महादेव ! ही गर्जनाहि मोठी !
खड्गांचा खणखणाट मोठा शरवृष्टीहुनी !
वीरांचा फणफणाट गेला आकाशीं चढुनी !!
मुंडकटायी प्रचंड समरीं म्लेंच्छांची झाली;
धडावरीं शिरकमळें दिसलीं फक्त मराठयांची !

४

सायंकाळीं सूर्य पळाला अस्तगिरीमागें,
फिरलीं सैन्यें राहियले ते मुडदे तेथेंच.
पक्वान्नाचे कसेबसे दो घासच घेऊन
करणें बोलाविले आपुले बारा सरदार.
आतां कुठले बारा ? करणा, चारच ते उरले !

अष्ट दिशांनीं आठ घेतले अपणां वांटूनी.
दहा दिशांनीं दशशत नेलें तुझें सैन्य आज;
आतां उरले चारशेंच रे करणा, तुजसाठीं !
करणा आतां आठवलें तें कुमारिचें पाप !
नाचत होता त्याच्या पुढतीं दुष्ट सतीशाप !!

५

" करणपिताजी ! क्षमा करावी मजसी धैर्याची !
वाणी माझी नसे; खरोखर ही कौमार्याची !!
दुष्ट दांडगा पुष्ट लांडगा असे; मुसंडा हो,
करील धाडस धरील पाडस अपुलें हें खास !
मजसीं द्यावें पाठवुनी हो देवगिरीवरतीं;
आतां जाणा वेळ धरा ती सोयरीक चित्तीं !
कुमारिकेनें प्रीति आपुली मनांत ठेवावी;
परंतु येतां प्रसंग ऐसा जनांत बोलावी.
तात ! असे या हृदयावरतीं शंकर कोरियला !
सतीप्रेम हो जाळिल जाणा त्या सतिशापाला ! "

६

जिकडे तिकडे धुंद मातला अंधकार सारा;
रणावरीही तरसें कोल्हे खाति मेजवानी !
दिवसाचा तो रणदेवीचा भीषणतम नाच
आतां होता दडला सारा गिरिकुहरीं रानीं !
समरकढायी कटकवरांची रविसी दे ताप,
म्हणुनी गेला किरणे सगळीं वेचुनिया पळुनी.
रणोत्सवाची भीति वाटुनी जीं होतीं दडलीं
नक्षत्रांची एकच गरदी झाली त्या गगनीं !

ठायीं ठायीं डबकीं बघुनी रक्ताचीं क्षेत्रीं
किती बिचाऱ्या गळुनी पडल्या पोरी गगनींच्या !
अंथरलेला रणदेवीचा प्रसाद वीरांचा—
खाया आला होता तेथें मृत्यूचा जबडा !
' आज न मेलों, उद्यां असे तें मरणें त्या क्षेत्रीं; '
विचार करुनी भोगत होता मुसलमान्य सौख्य !

७

डाळिंबाचें शराब आणिक मद्यांचे पेले
देतच होत्या सुंदर नारी वीरांच्या हातीं.
सुंदर नारी ! होत्या सगळ्या परंतु हिंदूंच्या !
खेडयांमधल्या बाया बटकी केल्या जुलुमानें !
" भाई तखरीफ ! नजीक आहे खेडें वेरुळचें !
सुंदर सुंदर कळ्या कोंवळ्या हुंगू तिथल्या हो !
कळलें वेरुळ कोमळ निर्मळ पोरींचें खेडें !
नूपुरनादें रुणुझुणु रुणुझुणु त्या करिती वेडें !!
फुटण्यापूर्वीं पूर्वेची ती लालभडक पोर,
येऊं पोरी पारखून हो नाजुक खेडवळ !
असो कुमारी असो कुणीही हिंदू कीं यवनी,
जाणा दख्खन ही दिल्लीची भोगांची भूमी ! "
वदला एकच परी निघालें पथकच अफगाणी;
नव्हता त्यांचा नको म्हणाया अधिकारी कोणी.

८

तिकडे बाळी कोमल देवल करणें धरिली पोटाशीं;
गहिंवरला तो, गळा दाटला, डबडबलाही नेत्रांत !
" छबडया ! माझ्या दीन पाडसा ! " स्फुंदोनी तो पिता रडे !
" जाई देवल देवगिरीसीं, प्राण वाचवीं तिथें तरी !

तूं तर माझा प्राण, बाण तो माझ्या देहधनुष्याचा;
वरुनी शंकर हो गे किंकर पतीसवें तूं जनतेचा !
जा बाले जा ! सोडीं पितया; दयाच ही या समयासीं !
सती कोपतां सतीच नेत्ये स्वर्गीं अपुल्या पितयातें—
हा ! हा ! देवा ! दुश्चिन्हें हीं कां मज घडतीं घडो घडी ?
दीप असा कां उगाच आतां फडफडतो हा अम्हांपुढें ?
सायंकाळीं सारस सरला बुद्धिपुरस्सर उजवीचा;
नभांगणींही कसा अचानक सुटला सर्पहि घारीचा ?
त्यजितां गुर्जर अश्रुपात ना घडलाही निळकंठाचा;
आजच संध्याकाळीं खळखळ अश्रु गळाले कां त्याचे ?
हरहर तुटली प्रत्यंचाही नच चढवीतां धनूवरी !
बाले, चल, जोहार करोनी ठरवीं खोटा सतिशाप !! "
" करणपिताजी ! दुश्चिन्हें हीं नच अपुली परशत्रूंचीं !
दीप कथीं मज ' जा गे सहजच मानसपतिगृहिं आतांच ! '
सारस सरला बुद्धिपुरस्सर देवगिरीच्या दिशेकडे;
नभांगणींही दिसलें खचितचि देवल सुटली खानाची !
निळकंठाला साहवला ना वियोग अपुल्या कन्येचा;
प्रत्यंचेचा प्रत्यय हा कीं पुन्हां चढावें धनूवरी !
जोहाराचें जहर विखारी नारी घेत्ये पतीस्तव,
पति मिळवायां करीं धरायां खड्गच, जात्ये वधू अशी—"
खड्ग धरोनी एका हस्तें ढालहि धरिली कुमारिनें;
गुप्तच वेषें पहा निघाला दोनतीनशें मग वीर,

९

नंतर कडव्या दोन तीनशें क्षत्रियवीरांनीं
देवलदेवी चालविली ती मेण्यांतुनि छपुनी.
होते:आणिक दोन चारही मेणे दासींचे;

गेले होते चढून अगदीं वेरुळचा घाट.
होते त्यांच्या नेत्रांपुढती गिरिचे दिव्य दिवे;
होता त्यांच्या मनांत तेव्हां जयानंद पूर्ण !
होती देवलदेवीही ती वरसौख्यस्वप्नीं
होतें झळकत तेज तिच्या त्या कमलावरि तेव्हां !
होती सारी सफलच झाली कुमारिची प्रीत;
होता अगदीं विफलच झाला सतिचा शापार्ध !
तोंच तियेचें कुंकुम पुसलें घर्मजलानें तें;
घर्महि आला कारण दिसलें अफगाणी सैन्य !
मेणे बघुनी देणें ध्याया यवनी व्यापारी
आला करुनी दीन दीन तो घोडा फेकूनी !
खरा वीर रजपूत रणाचा खराच तो मित्र;
कुमारिकेच्यासाठीं केला छातीचा कोट !
लढतां सरतां मागें केला एकजात वीर !
देवलदेवी तशांत गेली मग 'कैलासांत.'
तोबा ! तोबा ! करुनी फिरलें अफगाणी सैन्य;
दासींनींही तिथेंच केला होता जोहार !
परंतु एका अफगाणें मग बहुतची चिडुनी,
धार धराया शिवावरी ती धरिली वनवाट.
चुकवाया तद्दृष्टी लपली देवल गाभ्यांत;
त्याचमुळें ती पडली नारी लांडयांच्या हातीं.

१०

अत्यानंदें तिला धाडिलें अलफें दिल्लीसी;
कमलाराणी तुष्ट जहाली भेटुनि दुहितेसी.
परंतु देवलबाला कैसी रुसली वा फुगली !

---

1 कैलास नावाचें वेरुळच्या लेण्यांत एक अतीव सुंदर कोरीव मंदिर आहे.

खंत करोनी किती कशी ती वाळूनी गेली !
कौमार्याचा अपजय झाला, सतिशापा विजय—
कसा कुठें कोणत्या थरावरि; हें माझें काव्य.
वक्तृत्वाचें निशाण माझें नूतन हें सारें;
रसमाधुर्य नवनि आणिम रुचि मी कौशल्यें !
सडलेल्या डबक्याचें पाणी मानवतें ज्याला;
दुर्गंधीचीं कमलें असती प्रिय ज्या रसिकाला;
ठरीव भाषा ठरीव गोषा ठरीव ज्या गोठा;
ठरीव चित्रें ठरीव पात्रें ठरीव नेत्रेंही;
ठरीव डोकें ठरीव नाकें ज्याच्या वाटेंत;
एक भावना एक कल्पना एक चोदना हो;
नियामकांचें नियमन असल्या क्षुद्रासाठींच;
माझ्यासाठीं स्वतंत्रतेचा तो दैविक नाच !

## अंत

" देवल, बकुळे, चिमणे, बाले, दया न कां तुज ये अजुनी ?
तव ही माता झुळते हातां; बघ ही अश्रूंची सरिता !
होणें जाणें तुझ्या नि माझ्या कोणाच्याही नच हातीं;
अल्लापुढतीं गिल्ला करणें नच शोभे गे अपणातें.
वैभवशाली अनहिल मोठा खोटा ठरला दिल्लिपुढें;
कुणी वदावें दिल्लि न जाइल जळूनी अल्लाच्या कोपें ?
लंब्या चवडया थापा मारित होत्यें पातिव्रत्याच्या;
कळोनि आलें खुळेंच सारें हृदयाचें गे हें जाळें !
कुणी कुणाचा वालि न साचा, जो तो अपुला बादशहा;
दरकत धरितां हरकत येते ठायीं ठायीं मनुजाला.
धन दारा पति नरगण भूपति असती मनुजाच्या हातीं;
पराक्रमानें यश मिळवावें सुख भोगावें ही नीति ।

काळावरतीं जाळें देतो फेकुनि वीर्याचा पुरुष;
नीतिअनीती धर्माधर्महि जाती वीर्याच्या पाठीं.
अकलमंद मी धुंदच होत्यें अनहिलवैभवभोगांत,
कळला येथें लावण्याचा पराक्रमाचा मज भोग ?
भोग भोगणें करुनि दिवाणे पुरुषांतें गे या जगतीं,
युद्धापायीं जिवंत करण पृथ्वीतें ही स्त्रीनीति.
पातिव्रत्यापायीं शमलें रण लवकर त्या घोरीचें !
मरतां पृथ्वी झाली उर्वी बटीक सारा लांडयांची !
भोग न पृथ्वीचा पर होता साम्राज्ञीचा गे सारा;
जोहारांचा भडका ठरला मित्रच यवनी विजयांचा !
भोगाची स्त्री मूर्ति सुंदरा पुतळा वीर्याचा पुरुष,
म्हणुनी वदत्यें दिल्लिपतीचे भोग भोगतें मनसोक्त !
जोहोरींनीं बोहोरींनीं मौक्तिकमाला अर्पियल्या;
भरजरदारी मरवे शेले सरदारांनीं पाठविले,
तलाव चक्राकार मनोहर मांडव द्राक्षांचे गार !
सुरू रुमाली रस्त्यांवरती आनंदविती नेत्रांतें !
मकरंदाची अपरंपारच लूट लुटोनी हे भृंगे
सुरावरीही तालच देती नेती हृदया खेचूनी !
विचार सारासार भासतो असार सारा बागेंत;
स्त्रीभोगाची कमाल येथें, पुरुषांची ही रणभूमी !
असेल प्रीती खरी अंतरीं देवल, पितयाची तुजसी,
फिरीव किल्ली सौंदर्याची जाळी पुरतें दिल्लीसी !
खिलजीचा म्यां खिझराचा त्वां बळि घ्यावे गे भोगूनी,
रजपूतांचा पूत मराठा तयेंच येइल धावोनी ! ”

२

ऐसी अधमा नीति बेगमा पढवी पडत्या पोरीसी;

अजाण बाला अभागिनी ती चवदा वर्षांची कलिका !
फुलतां नलिनी मनोहारिणी पडला अग्नी तिजवरतीं !
क्षणांत रमणी पडली धरणीवरतीं मातादंशांनीं !!
करण पिताजी–विरहाग्नीनें अन्नांशहि नच पचवावा;
प्रीतिजलेंही शंकरजींच्या तृप्त पिपासा नच व्हावी.
स्पर्शापूर्वीच गळोनि गेलें प्राजक्तीचें तें फूल !
जुईकळी ना फुलली पडली तोंच खुडोनी मातींत !
अनाररंगा दंतांनींही त्या चंद्राच्या सोडियलें;
नक्षत्रांची क्षत्रियकन्याप्रभा परीची मंदवली !
राजा करणाचा चिंतामणि कण झाला विरहाग्नीचा;
शंकरदेवा काळ पातला खचितचि बुद्धिभ्रंशाचा !
तरी तियेचें लुप्त न झालें आर्यतेज सौभाग्याचें.
शंकरमानससाध्वी वदली वच मातेसी स्फूर्तीचें !

३

" माते, तुजसी हात जोडित्यें, पायां पडत्यें तुझ्यापुढें !
कुररी दीना ही पतिहीना पदर पसरित्यें त्वद्वाला !
अनहिलाची गजशाळा ही माझी मजसी प्यार अति !
मला न रुचतें; खुपतें भारी गजवैभव हें दिल्लीचें !
करणपिताजी फिरती रानीं वनांत रात्रींबेरात्रीं,
तिथेंच त्यांचा आणिक माझा अनहिलपूर्वजभक्तीचा !
पिता जिथें निज पायांवरतीं उभा असे गे मम माते !
तिथेंच माझी नी त्यांची ती गुर्जरराज्याची सीमा !
त्यांची दारा माझी माता मेली आम्हां केव्हांच;
तूं अग्नीची शिखाच, पंखा अविंधकामाग्नीलाही.
तुझ्यामुळें रखरखलें सारें माझ्या पितयाचें हृदय
म्हणुनिच उठली प्रीत तयाची रूपसुंदरीसाठीं ही.

जळो जळो हें जिणें तुझें गे, जळो तुझी ती बुद्धी ही !
भोगनीति ती तुझी; न असुच्या आर्य क्षत्रियरक्ताची !
' भोगाची स्त्री मूर्ति सुंदरा ! '–पारि पतिचें तें रतिस्थल !
भोगापायीं कधीं न घेत्ये आर्यस्त्री पतिचे प्राण !
देशहिताच्या पोंचट साऱ्या तुझ्या वल्गना मज गमती;
साफ सफेता पापांवरतीं परबुद्धीचा तूं देशी !
जोहारांनीं वीर्य वाढलें रक्तसुवर्णहि तापविलें;
पर भोगांनीं भोंसकिलें गे, तुझ्यासमच या देशातें !
' कुणी कुणाचा वालि न साचा जो तो अपुला बादशहा; '
बाता साऱ्या चावट लोंचट पोंचट धर्मांधत्वाच्या !
खुळेंच जाळें हृदयाचें गे तुझ्यासारख्या अभागिला
प्रीतिज्योती कुमारिकेच्या कुंवार असते प्रेमाला.
होसी कां बेलगाम बेगम ? स्त्रीजातीची लाज धरीं !
कुमारिकेच्या प्रीतिसुगंधा नच ऐसें गे अवमानी !
आर्यांचें कौमार्य नको गे देऊं म्लेच्छांच्या शेजीं;
अत्यानंदें गुप्तच वेषें जाऊं दे माझ्या देशीं
कुमार माझा दक्षिणदेशीं उत्तरेस हें कौमार्य;
कुंवार माझी प्रीत जुळूं दे माझ्या शंकरदेवाशीं !
अथवा देईं विखार अहि मज डंखाया या हृदयासीं;
शंकर शंकर या जयघोषें जाइन मी गे स्वर्गासीं !
पडतां खालीं प्रेत तयासीं होइल माझी आठवण;
यवनस्पर्शें होइल माझ्या पतिचा गे बुद्धिभ्रंश ! "

४

कमलाही स्त्रीच होती रक्ताची आर्य ती;
मातेचें ह्रदय होतें जरि अधमा जाहली.
दुहितेची करुण वाणी परिसोनी भामिनी

आणी ती स्वमनीं तेव्हां कौमार्या आपुल्या.
होती ती भीमसिंगा निज हृदयीं पूजित;
परि जाया जाहली ती करणाची सुंदरी.
एकाची नार होती दुसऱ्याची लाडकी;
करणाचें मरण तेव्हां ओढवलें प्रीतिचें !
प्रीतीनें लक्ष नेलें सुंदरिच्या पाठिंच;
पापांची रास झाली, झाली ती राखच !
तीं पापें आज आलीं कमलेच्या अंतरीं;
पापांची राख होतां प्रीतिच ये उमलुनी !
झाले ते नेत्र तेव्हां सजलच त्या चारुचें;
धुंदीही नष्ट झाली भोगाच्या दारुची !
भांगेचें रान दावी तुळशीचें रोपडें;
घेई ती कमल बाला निज हृदयीं दाबुनी !
" बाले ! हो शांत ! शोका सोडीं गे या क्षणीं !
देइन मी पाठवूनी तुजसी त्या दख्खनीं.
रात्रीं त्वां पुरुषवेषें जावें गे सोडुनी;
दाविल तो भाट ' भूसा ' तुजसी ती उज्जनी.
तेथें घ्या ब्राह्मणांचें सुंदरसें सोंग तें;
ओंकारीं भिल्लराजा गांठावा तेथुनी.
दाविल तो तुजसि बाले, देवगिरीवेसही,
मग जाईं भेट द्याया निज पतिसीं सुंदरी—

५

" तोबा ! तोबा ! फितूर बेगम करित्ये रंगमहालीं ! "
खिझरखान हें आला बोलत त्वेषें होउनि लाल.
" बेगम, गमजा फारच करितां ! कृतघ्न काळी कुत्ती ! "
दंत रोवुनी अधरीं, हाणी लत्ता भूमीवरतीं

आले तेथें पंचवीस तों नंग्या समशेरींचे
काळे काळे शिद्दी, डोळे त्यांचे लालच होते !
" उचला टाका भुयारांत त्या अंधेऱ्या, वृद्धेला !
खडा पहारा फजरीं सोडा, नच सोडा कोणाला !"

६

वदुनि असें मग खिझरें तिथलें दार लावियलें,
" प्यारी ! दे तें शराब मजसीं प्रीतीच्या मोलें !
जवान योद्धा दिल्लीचा हा खरा धनी प्यारी !
लावण्याची लूट करूं दे या मोहक कालीं ?
सौंदर्याची खाण खणूं दे या व्यापाऱ्यासीं;
रणें लढोनी तुला घेतलें मी बहुमोलानें !
व्यापाराची बात न रुचत्ये तुजसी कां देवी ?
तर मग घेई या हृदयाच्या रक्ताचें मोल !
देवल ! अल्ला साक्ष असें या माझ्या वचनास !
तुझ्याचसाठीं वेंचिन मी हें सारें साम्राज्य !
कठोर पापी अधमाधम तो अल्लाउद्दीन;
तया न ठावें प्रीतीची ती खरीखुरी बाग !
फार कशाला ? देवल, होतों मी अंतरिं हिंदू ;
देई एकच तो प्रेमाचा शब्दसुधासिंधू !
देतों वचना प्रीती वीना करीत ना स्पर्श;
मात्र ' प्रियाळा ! मी तुमची ! ' हे गडे बोल शब्द ! "

७

मिठास वाणी, मोहक बांधा, राजपिंड त्याचा,
घेती आकर्षुनी तियेच्या प्रीतीचा सांठा !
चिराक होते देन सुगंधा चमेलिच्या तैलें;
दरवळताही होता तेथें सुगंध हीऱ्याचा !

होतें तेव्हां तिचेंहि फुटुनी कोमल लावण्य;
मदनाचाही मारच होता सुमशर वृष्टीचा.
थबथबला त्याचाही इष्का होता नेत्रांत;
टपोर काळे डोळे मोठे अर्धे मिटलेले !
तारुण्याचा पुतळा गोरा समोर जणुं हंस !
होती हंसी सोज्वळ गोरी थोडि पाठमोरी ?
मयूर होता डौलानें निज पिसार फुलवोनी;
लांडोरीनें अंग जरासें चोरुनियां धरिलें !
होतें त्याचें अंगहि सारें रोमांचित तेथें
तिचेहि होते रोम जरासे कुरळे फुरफुरुनी !
साम्राज्याचा चढला होता मद त्याच्यावरतीं;
सुप्त तियेचा मदही होता पाहत उसळाय[1] !
गोरी गोरी:पान नार ती; लाल लाल गाल !
न्यारी न्यारी लज्जत होती देखत कामाची !
गोऱ्या गोऱ्या पान मुखाचे लाल लाल ओठ
फुरफुरुनी तिज सांगत होते प्रीतीच्या गोष्टी !
तरी तियेचें लुप्त न झालें आर्यांचें तेज !
जरी तियेच्या पुढती होती तरुणाची शेज !

८

" खिझरा ! मजसीं सोडावें त्वां जाणोनी दासी ! "
' दासी ' वदतां खुदकन् हसली ती आणिक तोही !
हास्यामागें हास्यें आलीं, ओठाला ओठ—
लागाया कां उशीर लागे पुढल्या गोष्टीस ?
झाल्या गोष्टी, झाला तेव्हां शाप फलद्रूप !
यवनें नेलें गुर्जरभूपा खोलच नरकांत !
हिंदूनींही नेलें यवनी नरकाच्या द्वारीं !

झाला लंपट खिझर शेवटीं देवलदेवीशीं !
गज्जलराजा अमीर खुश्रू करि वर्णन त्यांचें
यतिराजाही चळेल तसल्या श्रृंगारश्रवणें !
शूर मराठा सह्याद्रीचा कवि या शतकांचा,
श्रृंगारींही हार न जाइल खुश्रुतें साचा.
परंतु पडली देवळ पडला वधुपक्षाकडचा,
अभागिनी ती शिवाय, म्हणुनी स्फ़ूर्ति न मज तसली !
झाली राणी, केलें कांहीं वर्षांचें राज्य;
बंडें झालीं, गेले डोळे खिझराचे फुटुनी !

अखेर त्यासीं मारियलेंही एका भंग्यानें !
भोगियलेंही सरदारासम तिज अस्पृश्यानें ! ! !
बुद्धिभ्रंशच झाला खालीं शंकरदेवासी !
त्यानेंही गिरविलाच कित्ता गुर्जरभूपाचा.
त्यालाही भोंवला सतीचा शाप त्याच कालीं;
मलिक काफ़ुरें त्यालाही मग कांपियलें समरीं !
त्या समराचें त्या पापाचें गान असे केलें
' प्रसाद ' नामें मम मित्रानें स्फ़ूर्तिप्रद काव्यीं.
' मनोहराची लीला ' झाली शंकरमरणाची—
स्फ़ूर्ति तशी त्या काव्याचीही माझ्या मित्राची !

देवल करणाची दुहिता तरि नाथाची स्फ़ूर्ति;
मनोहराची लीला भार्या, तिवारीची कीर्ति.
नाथ मराठा गाई गाणें क्षत्रियकन्येचें;
दख्खनगाणें तेजस्वी तें कनोजपुत्राचें.
देवललीला शंकरनामां संलग्नच झाल्या
म्हणुनी करितो मुजरा शाहिर त्या मम मित्राला !

९

विनायका ! हा मुजरा घ्यावा आपणही माझा !
डफा ! तुलाही प्रणाम करितो हा दख्खन भाट !
हिंदुस्थाना ! माझ्या देशा ! जीवींच्या जीवा !
तुझ्याचसाठीं खर्चीं घालिन जन्माचे जन्म ! १९०
तुला जधीं मी पाहिन राजा ! अवनिं गुरुस्थानीं !
तधींच घेईल माझा आत्मा थोडी विश्रांति ! ! ५३८

REFBK-0002566
REFBK-0002566
मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क. २५८३६
ठाणे

छापत आहेत ! !

छापत आहेत ! !

सारस्वत प्रसारक मंडळीचीं

# नवीन व उपयुक्त पुस्तकें

## रेंदाळकरांची कविता

निर्यमक कवितेचे प्रसिद्ध प्रवर्तक कवि एकनाथ पांडुरंग रेंदाळकर यांची समग्र कविता त्यांचे जिवलग स्नेही रा. वामन जनार्दन कुंटे यांनीं संग्रहित केली असून ती आम्ही लवकरच प्रसिद्ध करूं. या संग्रहांत रेंदाळकरांच्या हृदयंगम स्फुट कविता प्रसिद्ध केल्या असून रेंदाळ-करांच्या कवितेचा विशेष, तिचा मराठी काव्यावर झालेला परिणाम, निर्यमक कवितेचे प्रवर्तक या नात्यानें त्यांनीं घडवून आणलेली क्रांती यांचें मार्मिक विवेचन आरंभीं जोडलेल्या रा. ग. त्र्यं माडखोलकर यांचे प्रस्तावनेंत केलें आहे. पृष्ठसंख्या सुमारें ४५० असून किंमत अवघी रु. २।४ ट. ख. नि.

## राठोडवीर

ही हृदयंगम कादंबरी कै० ए. पां. रेंदाळकर कवि यांच्याच लेखणीं-तून उतरली असून मननीय आहे. किंमत ।१२ ट. ख. नि.

## दुटप्पी कां दुहेरी

ही कादंबरी प्रख्यात विनोदी लेखक व नाटककार रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या मार्मिक व विनोदप्रचुर लेखणींतून उतरली असून त्यांची ही पहिलीच कादंबरी होय. ही कादंबरी अत्यंत विनोदी आहे. किंमत १।४ ट. नि.

## राजा शिवाजी

कै० माधवराव कुंटे यांचें हें लोकविख्यात काव्य आम्ही छापिलें असून त्याची त्वरित मागणी न केल्यास पुढें मिळेलच असें सांगतां येत नाहीं. किंमत १ रुपया; ट. ख. नि.

**सारस्वत प्रसारक मंडळी,**

सदाशिव, पुणें शहर.

# सारस्वत प्रसारक मंडळीचीं

## संग्रहणीय व वाचनीय पुस्तकें

| | |
|---|---|
| काव्यतुषार ( लेखकः—तिवारी व अधिकारी ) | ०८ |
| कमलपराग ( सोनाळकरांची कविता ) | १०८ |
| वेणुनाद ( कवितेचें पुस्तक ) | ०४ |
| प्रेमयोग नाटक ( सोनाळकर ) | १ |
| लेंभे यांची कविता | १ |
| वनसुधा व वेणुसुधा | ०८ |
| सुनीतावलि ( गो. गो. अधिकारी ) | ०८ |
| मनोरंजक गोष्टी पुस्तक पहिलें | १ |
| सगन भाऊकृत लावण्या व पोवाडे | १ |
| वेणीसंहार नाटक | २ |
| वेणसिंहारचर्चा ( त्र्यं. सि. कारखानीस ) | ०४ |

खालील पुस्तकें छापत आहेत.

| | |
|---|---|
| रेंदाळकरांची कविता | २०४ |
| राठोडवीर ( कै. रेंदाळकरकृत कादंबरी ) | ०१२ |
| माधवांची ऐतिहासिक कविता | ०८ |
| दुटप्पी कां दुहेरी ( ले. श्री. कृ. कोल्हटकर ) | १०४ |
| राजाशिवाजी काव्य ( कै. कुंटे ) | १ |
| माडखोलकरांचा लेखसंग्रह | १ |
| बाळाबहिरूच्या लावण्या व पोवाडे | १०४ |

—ट. ख. निराळा—

पुस्तकें कोणत्याही प्रसिद्ध दुकानीं मिळतील.

**सारस्वत प्रसारक मंडळी सदाशिव पेठ, पुणें शहर.**